नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११६ Issue - 116 | वार - रविवार दि. २० सप्टेंबर २०२६ Blow- Sunday Date 20 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भाविकांची कार नाल्यात वाहून गेल्याने आठ जणांचा मृत्यू

## मध्य प्रदेशच्या आगर माळवामध्ये दर्शनासाठी ओडिशाहून भाविक आले होते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भोपाळ: भाविकांची कार नाल्यात वाहून गेल्यानं ८ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ३ लहान मुलं, २ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे. हा अपघात प्रसिद्ध सिद्धपीठ माँ बगलामुखी मंदिराच्या जवळ घडला. घटनेची माहिती मिळताच प्रशासनानं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं. अपघातानंतर स्थानिकांनी नाल्याजवळ तोबा गर्दी केली होती. या दु:खद घटनेनंतर हळहळ व्यक्त होत आहे. मध्य प्रदेशच्या आगर माळवामध्ये दर्शनासाठी ओडिशाहून भाविक आले होते.



रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. रात्रभर पडलेल्या पावसामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहू लागले. रात्रीचा अंधार आणि मुसळधार पावसामुळे कार चालकाला पाण्याचा अंदाज आला नसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पाण्याचा अंदाज चुकल्यानं कारवरील नियंत्रण सुटून ती खोल पाण्यात पडली असण्याची शक्यता पोलिसांनी बोलून दाखवली.

सकाळच्या सुमारास स्थानिकांनी नाल्यात पडलेली कार पाहिली. ग्रामस्थांनी अपघाताची माहिती पोलीस आणि स्थानिक प्रशासनाला दिली. घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय अधिकारी, पोलीस दल, एसडीआरएफचं पथक अपघातस्थळी दाखल झालं.

बचाव पथकानं क्रेन आणि पाणबुड्यांच्या मदतीनं कार आणि त्यात अडकलेले शव नाल्यातून बाहेर काढले. यासाठी बचाव पथकाला अनेक तास लागले.

दुर्दैवी अपघाताची माहिती परिसरात वाऱ्याच्या वेगानं पसरली. यानंतर घटनास्थळी ग्रामस्थ आणि भाविकांची तोबा गर्दी झाली. मदत आणि बचाव पथकानं महत्प्रयासानं कार आणि त्यात अडकलेले मृतदेह बाहेर काढले. तो प्रसंग पाहून उपस्थितांच्या काळजात चर्रर्र झालं. अनेकांचे डोळे पाणावले. स्थानिकांनी या हृदयद्रावक अपघातानंतर हळहळ व्यक्त केली आहे.

अद्यापपर्यंत मृतांची ओळख पटलेली नाही. कारचा नोंदणी क्रमांक आणि अन्य दस्तावेजांच्या आधारे मृतांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पोलिसांनी सर्व मृतदेह ताब्यात घेऊन जवळच्या रुग्णालयातील शवागारात पाठवले आहेत. मृत कुटुंब ओडिशातील असल्याची माहिती समोर आली आहे. अपघाताचा तपास सुरू आहे. या अपघातानंतर स्थानिकांनी प्रशासनाच्या विरोधात रोष व्यक्त केला.

# लोहगड हत्याकांड : २५०० पानांचे चार्जशीट दाखल! पोलिसांचा तपास पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : पुण्यातील प्रसिद्ध लोहगड किल्ल्यावर घडलेल्या व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्येच्या प्रकरणाला आता मोठे कायदेशीर वळण मिळाले आहे. अवघ्या महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचा लोणावळा ग्रामीण पोलिसांनी अविरत तपास करून तब्बल २५०० पानांचे महाकाय दोषारोपपत्र वडगाव मावळ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात सादर केले आहे. भावी पत्नीनेच आपल्या साथीदाराच्या मदतीने केतन यांना दरीत ढकलून ठार मारल्याचा संशय या प्रकरणात असून, पोलिसांनी सादर केलेल्या या आरोपपत्रामुळे दोन्ही आरोपींच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

तपासादरम्यान जमा करण्यात आलेले अत्यंत संवेदनशील व तांत्रिक पुरावे पोलिसांनी या २५०० पानांच्या चार्जशीटमध्ये जोडले आहेत. यामध्ये प्रामुख्याने घटनास्थळावरून जप्त केलेल्या वस्तू, फॉरेन्सिक सायन्स लॅबचे अहवाल आणि डिजिटल पुरावे समाविष्ट आहेत. याशिवाय, केतन अग्रवाल, सिया गोयल आणि चेतन चौधरी यांच्यातील व्हॉट्सप चॅटिंग, फोन कॉल डिटेल्स तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांचे अहवाल तपासात अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांसह अनेक वैद्यकीय आणि सायबर तज्ज्ञांचे जबाब नोंदवून पोलिसांनी आरोपींविरुद्ध एक अत्यंत भक्कम केस तयार केली आहे.

न्यायालयात हे आरोपपत्र दाखल झाल्यामुळे आता खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीला सुरुवात होणार आहे. न्यायालय संपूर्ण कागदपत्रांची पडताळणी करून लवकरच आरोपींवर औपचारिक दोषारोप निश्चित करेल. दुसरीकडे, या प्रकरणातील सह-आरोपी चेतन चौधरी याचे वकील ड. राम सहाणे यांनी न्यायालयात चार्जशीट दाखल झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. पोलिसांच्या आरोपपत्राचा कायदेशीर अभ्यास करून आम्ही न्यायालयात आमची बाजू मांडू, असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

ऐतिहासिक लोहगड किल्ल्याच्या दरीत ढकलून केतन यांची हत्या करण्यात आल्याच्या बातमीने मावळ तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्हा सुन्न झाला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून लोणावळा पोलिसांनी ज्या तत्परतेने आरोपींना बेड्या ठोकल्या आणि कायदेशीर मुदतीत हे भक्कम आरोपपत्र न्यायालयात सादर केले, त्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. या तांत्रिक आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे केतन यांच्या दु:खी कुटुंबाला न्यायालयातून लवकरात लवकर आणि कठोर न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# कृषिमंत्र्यांचा ताफा शेतकऱ्यांनी अडवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंगोली : पावसाळा सुरु होऊन साधारणत साडेतीन महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्यापही राज्याच्या बहुतांश भागात पाऊस पडलेला नाहीये. त्यामुळं शेतकऱ्यांची उभी पिकं करपू लागली आहेत. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज हिंगोली जिल्ह्यातील पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. जिल्ह्यातील बोराळा या ठिकाणी दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी दत्तात्रय भरणे यांना कर्जमाफीचा लाभ गावात कोणालाही मिळाला नसल्याची तक्रार केली.

सरकारनं कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी सुरु केली आहे. कर्जमाफीच्या दोन याद्या सरकारनं जाहीर केल्या आहेत. मात्र, अद्यापही अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित असल्याचं चित्र पाहायला मिळालं आहे. हिंगोली जिल्ह्यातील बोराळा या ठिकाणी दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी शेतकऱ्यांनी दत्तात्रय भरणे यांना कर्जमाफीचा लाभ गावात कोणालाही मिळाला नसल्याची तक्रार केली आहे. यावेळी भरणे म्हणाले की, लवकरच तिसरी यादी येईल आणि त्यामध्ये कर्जमाफीचा लाभ मिळेल.

यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडून शेतीच्या बांधावर जेवणाचा आस्वाद घेण्यात आला. हिवरा गावात नुकसानीची पाहणी केल्यानंतर शेतामध्येच जेवणाला सुरुवात केली आहे. भाजी भाकरी खात सर्व यंत्रणा शेतात जेवत असल्याचं पाहायला मिळालं. यावेळी त्यांच्यासोबत खासदार रामराव वडकुते आमदार राजू नवघरे उपस्थित होते.

हिंगोलीमध्ये आज पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आले होते. यावेळी त्यांनी हिंगोली जिल्ह्यातल्या टाकळगाव येथे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली असून त्या ठिकाणी दत्तात्रय भरणे यांच्या या दौऱ्या संदर्भात हिंगोली जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी चांगला संताप व्यक्त केला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना काजू बदाम भेट दिली आहे. तर काजू-बदाम खायेंगे दुष्काळ पाहणी करेंगे अशा घोषणा यावेळी शेतकऱ्यांनी देत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा ताफा ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी अडवला होता. यामुळे कृषिमंत्र्यांच्या दौऱ्यामध्ये काही काळ चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता. कृषिमंत्र्यांनी तात्काळ दुष्काळ जाहीर करावा त्याचबरोबर शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी या शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती.

# अधिकारी काजू बदाम आणतात आणि बदनाम मात्र लोकप्रतिनिधी होतात : संजय शिरसाट संतापले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यासह राज्यभरात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि करपणाऱ्या पिकांमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांचे प्रश्न आणि व्यथा समजून घेण्यासाठी शनिवारी नांदेडच्या जिल्हा नियोजन सभागृहात एक विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, दुष्काळाच्या भीषण वास्तव आणि शेतकरी संकटावर गांभीर्याने चर्चा करण्याऐवजी बैठकीला उपस्थित असलेले नेते आणि वरिष्ठ अधिकारी काजू-बदामाचा आस्वाद घेण्यात मग्न असल्याचे उघडकीस आले आहे. या संपूर्ण प्रकारचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या या प्रकारावरून विरोधकांनी सत्ताधारी नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. शेतकरी संकटात असताना अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना मात्र स्वतःच्या आदरातिथ्याचीच जास्त काळजी असल्याचा संताप सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे. या बैठकीला ते गैरहजर होते आणि काजू





बदाम प्रकरणी बोलताना शिवसेना नेते आणि मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, माझे पूर्वनियोजित कार्यक्रम असल्याने मी बैठकीला गेलो नाही. उद्या मी स्वतः शेतकऱ्यांना भेटायला जाणार आहे. दत्ता भरणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत आणि तिथे अधिकारी उपस्थित होते. पण अधिकारीच असे काजू-बदाम आणून ठेवतात आणि बदनाम मात्र लोकप्रतिनिधी होतात, असंही ते म्हणाले.

मी विभागीय आयुक्त यांना सूचना करेल

उद्या मी शेतकऱ्यांना भेटायला जाणार आहे. पूर्वनियोजित काही कार्यक्रम असल्याने गेलो नाही, नांदेड येथील कृषिमंत्री यांच्या बैठकीला जावेच असे नाही. दत्ता भरणे त्यांची जबाबदारी पार पडत आहेत. त्या बैठकीला अधिकारी उपस्थित आहे. अधिकारी काजू बदाम आणतात आणि बदनाम आम्ही होतो, मी विभागीय आयुक्त यांना सूचना करेल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

अमोल खुणे यांनी काय आरोप केले मला माहिती नाही...

तर मनोज जरांगेंच्या जुन्या सहकाऱ्यांनी अमोल खुणे यांनी काल माध्यमांशी बोलताना केलेल्याआरोपांवरती बोलताना संजय शिरसाट म्हणाले, कुणी काय आरोप केले याचा माझा संबंध नाही, अमोल खुणे यांनी काय आरोप केले मला माहिती नाही.अब्दुल सत्तार आणि माझे चांगले सबंध आहे. मी शिरसाटचा शिरसाठ्यां झालो, तरी मी काहीही बोललो नाही. मी शांत यासाठी राहिलो की कालांतराने सत्य बाहेर येईल. कलगीतुरा होईल म्हणून बोललो नाही, त्यांना चुकीची माहिती दिली असेल, शांत बसणे हा त्यावरचा उपाय आहे असे मी मानतो, असंही संजय शिरसाट म्हणालेत.

याप्रकरणी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार रोहित पवार यांनी म्हटलं की, राज्यातील दुष्काळी परिस्थिती अतिशय गंभीर असली तरी सरकारला मात्र कुठलंही गांभीर्य नसून ते काजू-बदाम खात बसलेत. राज्य शासनाने या भयावह संकटाची गंभीर दखल घेत तत्काळ विशेष अधिवेशन बोलावून दुष्काळावर विस्तृत चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा देणं गरजेचं आहे.

**'कवच'साठी सिग्नलिंग व्यवस्था होणार मजबूत**

**प्रवासी आणि मालवाहतुकीला होणार फायदा**

# मध्य रेल्वे सोलापूर विभागातील सात स्थानकांवर २०९ कोटींची अत्याधुनिक सिग्नलिंग यंत्रणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय रेल्वेने सिग्नलिंग व्यवस्था अधिक आधुनिक आणि सुरक्षित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील सात स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली बसवण्यासाठी २०९ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. हाय डेन्सिटी नेटवर्क (HDN)-7 मार्गावरील रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने हे काम हाती घेण्यात येणार आहे.

या ७ स्थानकांवर होणार काम

ईआय प्रणाली मोहोळ, मुंढेवाडी, बाळे, सोलापूर, होतगी जंक्शन-होतगी ए केबिन, शहाबाद आणि वाडी जंक्शन येथे बसवण्यात येणार आहे. या मार्गावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगसोबतच कवच, ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग आणि केंद्रीकृत वाहतूक नियंत्रण यंत्रणांशी संबंधित कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे.



या प्रकल्पामुळे रेल्वेच्या सिग्नलिंग पायाभूत सुविधांना आधुनिक स्वरूप मिळणार असून, स्वदेशी 'कवच' स्वयंचलित रेल्वे संरक्षण प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा तयार होण्यास मदत होणार आहे. 'कवच' ही प्रणाली ट्रेनचा वेग आणि सिग्नलच्या स्थितीवर लक्ष ठेवून, आवश्यक परिस्थितीत स्वयंचलित हस्तक्षेप करण्यासाठी विकसित करण्यात आली आहे.

इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग ही संगणकाधारित सिग्नलिंग प्रणाली आहे. रेल्वे मार्गावरील पॉईंट्स आणि सिग्नल्सचे नियंत्रण या प्रणालीद्वारे केले जाते. पारंपरिक रिले-आधारित यंत्रणेच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक प्रणालीमुळे सिग्नलिंगमधील त्रुटी शोधणे आणि त्या दुरुस्त करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम होण्यास मदत होते.

तसेच देखभाल आणि रेल्वेच्या हालचालींचे व्यवस्थापन सुलभ करण्याच्या दृष्टीनेही ही प्रणाली महत्त्वाची आहे.

HDN-7 मार्गावरून प्रवासी तसेच मालवाहतूक गाड्यांची वाहतूक होते. त्यामुळे या मार्गावरील रेल्वे वाहतूक वाढत असताना आधुनिक सिग्नलिंग व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे. ईआय, एबीएस, सीटीसी आणि कवच यांसारख्या प्रणालींच्या एकत्रित वापरामुळे ट्रेनच्या हालचालींचे व्यवस्थापन, मार्गांची उपलब्धता आणि परिचालन कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते.

भारतीय रेल्वेच्या सिग्नलिंग आधुनिकीकरणाच्या व्यापक कार्यक्रमातील हा प्रकल्प आहे. पारंपरिक सिग्नलिंग व्यवस्था टप्प्याटप्प्याने आधुनिक तंत्रज्ञानाने बदलण्यासोबतच स्वयंचलित ट्रेन संरक्षण आणि प्रगत वाहतूक व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यावर रेल्वेकडून भर दिला जात आहे.

सोलापूर विभागातील या सात स्थानकांवर होणाऱ्या २०९ कोटी रुपयांच्या सिग्नलिंग अपग्रेडमुळे HDN-7 मार्गावरील रेल्वे परिचालन अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि कार्यक्षम करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे.

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन महिनाभराचा उपक्रम; प्रशासन जनतेच्या दारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे.

कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार

गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक तालुक्यात सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचे तर-ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.

गावात सेवा, गावातच समाधान

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे.

गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

शासनाची सेवा, समाजाचा सहभाग

याचा अर्थ एकच-शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

अंगणवाडीतही सेवा उत्सव

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे.

ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. विकसित भारत' आणि मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

लाभार्थ्यांच्या घरापर्यंत आशीर्वादाचा दिवा'

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

बदलाची गोष्ट आता गावागावातून

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.

म्हणूनच बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

सेवा संकल्पाची खरी दिशा

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे-सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**- (प्रवीण टाके)**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

# रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र २०२६ : युवकांच्या स्वप्नांना रोजगाराची नवी दिशा; एकाच दिवशी राज्यभर संधींचा महाकुंभ..!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती या विचाराला केंद्रस्थानी ठेवत महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यातील युवक-युवतींसाठी रोजगाराच्या संधींचे व्यापक दालन खुले करण्यात येत आहे. दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, राज्यभरातील युवकांना त्यांच्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

रोजगाराच्या शोधात असलेल्या युवकांसमोर अनेकदा योग्य संधी, योग्य रोजगारदाता आणि योग्य कौशल्य यांचा मेळ घालण्याचे आव्हान असते. दुसरीकडे उद्योग-व्यवसाय क्षेत्रालाही आवश्यक कौशल्य असलेले मनुष्यबळ शोधताना अडचणी येतात. याच रोजगारदाता आणि रोजगार इच्छुक यांच्यातील दरी कमी करण्यासाठी रोजगार महाकुंभाची संकल्पना आकाराला आली आहे. एकाच दिवशी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करून रोजगाराची संधी युवकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे.

या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे राज्यभर १००० ठिकाणी एकाच दिवशी रोजगार मेळावे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. औद्योगिक आस्थापना, चडचए, उद्योग संघटना, महाविद्यालये, विद्यापीठे, कौशल्य विद्यापीठे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), पॉलिटेक्निक तसेच विविध संस्थांच्या सहकार्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

१००० रोजगार मेळावे, एकाच दिवशी हा केवळ विक्रमी आकडा नसून, महाराष्ट्रातील युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन, उद्योग आणि कौशल्य यंत्रणा यांना एकत्र आणणारा व्यापक उपक्रम आहे. राज्याच्या प्रत्येक भागातील युवकांना रोजगाराच्या संधींच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे, उद्योगांच्या मनुष्यबळाच्या गरजा पूर्ण करणे आणि रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांना प्रत्यक्ष संधीशी जोडणे, ही या उपक्रमामागील प्रमुख संकल्पना आहे.

या उपक्रमाला उद्योग क्षेत्राकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, उपलब्ध माहितीनुसार राज्यभर १,०८० रोजगारदात्यांनी नोंदणी केली असून त्यांच्याकडून ६०,६५% रिक्तपदे उपलब्ध झाली आहेत. त्याचबरोबर ५%,६४८ रोजगार इच्छुक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे रोजगार महाकुंभ हा केवळ एक दिवसाचा रोजगार मेळावा न राहता, मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी आणि उमेदवार यांना जोडणारा राज्यव्यापी उपक्रम ठरण्याची क्षमता बाळगतो.

या महाकुंभाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे रोजगारासाठी उमेदवाराची तयारी. रोजगार मेळाव्यापूर्वी उमेदवारांना पूर्व-रोजगार प्रशिक्षण देण्यात येत आहे. करिअरविषयक मार्गदर्शन, स्वतःची ओळख प्रभावीपणे करून देणे, मुलाखत व मॉक इंटरव्ह्यू, व्यक्तिमत्त्व विकास व ग्रूमिंग, कार्यस्थळावरील कौशल्ये, संवाद कौशल्ये तसेच संबंधित क्षेत्रातील रोजगारासाठी आवश्यक तयारी अशा विविध बाबींवर प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष सरावाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

म्हणजेच रोजगार महाकुंभाची वाटचाल नोंदणी फ कौशल्य व मुलाखत तयारी फ रोजगार मेळावा फ निवड फ प्रत्यक्ष नियुक्ती अशा सर्वसमावेशक प्रक्रियेतून होत आहे. उमेदवाराला केवळ नोकरीची माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, त्याला मुलाखतीसाठी सक्षम करणे आणि योग्य रोजगाराशी जोडणे हा त्यामागील व्यापक दृष्टिकोन आहे.

विशेष म्हणजे रोजगार मेळाव्यानंतरही प्रक्रिया थांबणार नाही. उमेदवारांच्या निवडीचा आणि प्रत्यक्ष नियुक्तीचा मागोवा घेण्यासाठी झ्रींऊीश ढीरलज्ञळपस ची व्यवस्था करण्यात आली आहे. प्राथमिक निवडीनंतर प्रत्यक्ष नियुक्तीमध्ये रूपांतर व्हावे, यासाठी पुढील कालावधीत पाठपुरावा व आढावा घेण्याची यंत्रणा ठेवण्यात आली आहे. त्यामुळे रोजगार महाकुंभाचा भर केवळ उपस्थिती आणि निवडीच्या आकडेवारीवर नसून प्रत्यक्ष रोजगारनिर्मितीच्या परिणामावर राहणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक रोजगार बाजारात शिक्षणसोबत कौशल्य, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि मुलाखतीची तयारी तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे दहावी-बारावीपासून पदवी, पदव्युत्तर, खढख, डिप्लोमा आणि अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या विविध शैक्षणिक पार्श्वभूमीच्या युवकांसाठी रोजगाराच्या संधी शोधण्याची ही महत्त्वाची संधी आहे.

सांगली जिल्ह्यात १६ ठिकाणी रोजगाराच्या संधी -

रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र २०२६ अंतर्गत सांगली जिल्ह्यातही व्यापक नियोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील १६ ठिकाणी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील विविध भागांतील युवकांना त्यांच्या परिसरातच नामांकित उद्योग व आस्थापनांमधील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या रोजगार महाकुंभाची तयारी म्हणून सध्या जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (ITI) क्षेत्रनिहाय रोजगारक्षम प्रशिक्षण सुरू आहे. उमेदवारांच्या गरजा आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विविध क्षेत्रांशी संबंधित प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, स्वयं-परिचय, संवादकौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास तसेच रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांवर भर दिला जात आहे. त्यामुळे रोजगार मेळाव्याला येणारा उमेदवार केवळ नोकरीच्या शोधात नसून, नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक तयारी करूनच रोजगारदात्यांसमोर आत्मविश्वासाने उभा राहणार आहे.

रोजगार महाकुंभ - महाराष्ट्र २०२६ हा केवळ रोजगार मेळावा नसून युवकांच्या आकांक्षा, उद्योगांच्या गरजा आणि शासनाच्या कौशल्य विकासाच्या प्रयत्नांना एका व्यासपीठावर आणणारा व्यापक उपक्रम आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील युवकांनी या संधीचा लाभ घेत स्वतःची नोंदणी करावी, पूर्व-रोजगार प्रशिक्षणात सहभागी व्हावे आणि आपल्या कौशल्याला अनुरूप रोजगाराच्या संधींचा शोध घ्यावा.

२९ सप्टेंबर २०२६ हा दिवस महाराष्ट्रातील हजारो युवकांसाठी नोकरीच्या शोधाचा दिवस न राहता नव्या करिअरची सुरुवात करण्याचा दिवस ठरावा, हीच रोजगार महाकुंभामागील खरी अपेक्षा आहे. संधी मोठी आहे-व्यासपीठ राज्यव्यापी आहे-आता गरज आहे ती युवकांनी एक पाऊल पुढे टाकण्याची!

**- इनुजा शेख,**
**सहायक आयुक्त,**
**जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,**
**सांगली**

# सांगोला पोलिसांची अवैद्य जुगार अड्ड्यावर मोठी कारवाई २१ जनावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**






पंढरपूर - सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साते परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड, मोठी कारवाई केली आहे. महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम ८६६/२०२६ विक्रम १२(अ) अन्वये करण्यात आलेल्या कारवाईत ३६ लाख बत्तीस हजार १२० रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, २१ आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा श्री पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी( सोलापूर ग्रामीण) यांचा आदेश व मार्गदर्शनाखाली, तसेच अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे (पंढरपूर) यांच्या पूर्वेक्षणाखाली ही कारवाई पार पडली आहे. दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी छाप्यामध्ये जुगार साहित्य रोख रक्कम व मोबाईल फोन दुचाकी वाहने, चार चाकी वाहने, असा एकूण मुद्देमाल रुपये ३६,२२,१२० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जीवावर प्रतिबंधक कायद्यान्वये पुण्यात दाखल करण्यात आला असून. पुढील तपास सांगोला तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल कुलकर्णी, सदर माहिती पोलिसांनी नागरिकांना जुगार मटका बेकायदेशीर व्यवसायाची माहिती तात्काळ पोलिसांना देऊन सहकार्य करावे अशी आव्हान सांगोला पोलीस पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# पंढरपूरच्या कोरके पाटील कुटुंबांच्या घरी गौरी आगमनाचा उत्साह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - पंढरपूर येथील राजेंद्र कोरके पाटील यांच्या निवासस्थानी पारंपरिक पद्धतीने गौरीची उत्साहात आगमन करण्यात आले .यावेळी घरामध्ये आकर्षक सजावट करून गौरीची विधीवत स्थापना करण्यात आली.

गौरी आगमनानिमित्त घरांमध्ये बक्षीमय वातावरण निर्माण झाले होते. विविध फुलांची आरास व आकर्षक सजावट तसेच नैवेद्यांची सुंदर मांडणी करण्यात आली होती कुटुंबीयांनी पारंपारिक पद्धतीने गौरींचे पूजन करून सुख समृद्धी व आरोग्यासाठी पार्थना केली आहे.

याप्रसंगी राजेंद्र कोरके पाटील, शुभम कोरके पाटील यांच्यासह कुटुंबातील नातेवाईक उपस्थित होते व गौरी आगमनाचा हा सोहळा आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

गौरी गणपतीचे विठ्ठल रूपाचे डेकोरेशन करण्यात आले आहे. विशेष खास गौरी गणपती साठी पंढरपुरातील पंढरपुरातील विठ्ठलाचे डेकोरेशन गौरी गणपतीत करण्यात आले आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षण विभाग सज्ज

## सभापती चेतन सिंह केदार सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांच्या कायापालटचे नियोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच सार्वजनिक जीवनातील २५ वर्षाच्या सेवाभावी वाटचालीच्या निमित्ताने दिनांक १७ सप्टेंबर ते १७ नंबर २००० २६ या कालावधीत देशभरात सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे या अनुषंगाने नामदार जयकुमार गोरे मंत्री ग्रामविकास पंचायत राज्य तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैदही यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या शैक्षणिक सुविधा व गुणवत्ता विकास अभियानाला गती देण्यात आले आहे पालकमंत्र्यांच्या सोमवारच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जिल्ह्यातील शाळांना भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता व श्रेणी निहाय स्थितीचा सविस्तर आढावा घेत तयारी पूर्ण केली आहे.

ा संदर्भात जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीची सभापती इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतन सिंह केदार सावंत आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेचे उपलब्ध मूलभूत शैक्षणिक सुरक्षितता व अनुदानित सुविधांच्या आधारे एबीसी आणि डी अशा श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे विशेषतः श्रेणीच्या शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत त्यांना सीबी आणि श्रेणीत आणण्यासाठी शाळा निहाय सूचना देण्यात आले आहेत.

> **गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक सुविधा कमी पडू देणार नाही शाळांची भौतिक सुविधा समक्ष करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा समान महत्त्व देणे आवश्यक आहे गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक सुविधा व साधना सामोरी मध्ये कम तरता राहू देणार नाही प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना चांगली सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.**

शाळेमध्ये वर्गखोल्या पाणीपुरवठा, स्वच्छतागहे, विद्युतीकरण, किचन शेड संरक्षण भिंत, क्रीडांगण, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा अँड स्टेशन, रॅम संगणक सुविधा, इंटरनेट सीसीटीव्ही इंटरव्यू पॅनल आधी सुविधांना आढावा घेण्यात आला व धोकादायक इमारतीच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

तसेच शैक्षणिक विभाग व बांधकाम विभागातील अभियंत्यांची संयुक्त बैठक घेऊन शाळांच्या भौतिक सुविधा बाबत प्राधान्यक्रम निश्चित करण्यात निर्देश देण्यात आले आहे सर्व गटशिक्षणाधिकारी समग्र शिक्षण अभियानातील अभियंतांनी तालुका निहाय शाळांचा आढावा दिला.



# कळंबमध्ये स्थानिक गुन्हे शाखेची दमदार कामगिरी; गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसासह आरोपी जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, कळंब येथे गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या इसमास स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे.

पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार यांच्या आदेशाने मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणे व अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांचे पथक पेट्रोलिंग करत कळंब येथील चौकात आले असता पथकास गोपनीय बातमी मिळाली की, एक इसम हा भाटसांगवी पाटीजवळ थांबलेला असून त्याच्याजवळ एक गावठी पिस्टल आहे.

माहिती मिळताच पथकाने लागलीच घटनास्थळी सायं. ४.०० वा. धाव घेतली. भाटसांगवी पाटीजवळ संशयित थांबलेला दिसला. पथकातील स्टाफने तात्काळ गाडीतून उतरून त्यास शिताफीने पकडून ताब्यात घेतले.

त्याच्याकडे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव नवनाथ उर्फ बालाजी बबुवान काळे, रा. भाटसांगवी ता. कळंब जि. धाराशिव असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरेला खोवलेला एक लोखंडी धातूचा त्यास लाकडी पकड असलेला गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस असा एकूण २६,०००/- रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याच्याविरुद्ध पोलीस ठाणे कळंब येथे अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे कळंब येथे हजर केले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सपोनी श्री. अमोल मोरे, पोह/ अमोल चव्हाण, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, पोअं/ दहीहांडे, ठउझ चार पोलीस अंमलदार यांच्या पथकाने केली आहे.

# गणेशोत्सवात सामाजिक बांधिलकीचा जागर; ओंकार मित्र मंडळातर्फे मोफत आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टिटवाळा(कल्याण) : विजय घनघाव - दळवी वाडा, टिटवाळा येथील ओंकार मित्र मंडळाचा यंदाचा २४ वा गणेशोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा होत असून, गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा मंडळाने यंदाही कायम ठेवली आहे. याच सामाजिक जाणिवेतून मंडळातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाच्या 'आपला दवाखाना' या उपक्रमाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परिसरातील अनेक ज्येष्ठ नागरिकांसह तरुण-तरुणींनीही आरोग्य तपासणी करून घेतली. शिबिरात संपूर्णपणे मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधांचे वाटप तसेच विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या.

यावेळी कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. मुकेश ढगे यांनी मंडळाला भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. मंडळाच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करताना त्यांनी स्वतःचीही आरोग्य तपासणी करून घेतली.

यावेळी नागरिकांना मार्गदर्शन करताना श्री. ढगे यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असून, वेळोवेळी आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या, असा आरोग्यदायी कानमंत्र दिला.

गणेशोत्सव म्हणजे केवळ उत्सव आणि धार्मिक कार्यक्रम नसून, समाजासाठी काहीतरी करण्याची संधी आहे, या भावनेतून ओंकार मित्र मंडळाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले. भक्तीला सामाजिक सेवेची जोड देत मंडळाने 'गणपती बाप्पा मोरया'सोबत 'आरोग्य जपा, निरोगी राहा' असा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

> **आरोग्य हिच खरी संपत्ती, आरोग्य जपा, स्वतः ला जपा – मुकेश ढगे, पोलीस निरीक्षक कल्याण तालुका**

या आरोग्य शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ओंकार मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, 'आपला दवाखाना'चे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिव्या कातकरी, डॉ. स्वप्नील दिघे, डॉ भूषण गोरेकर व कर्मचारी तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

यावेळी रुग्ण सेवा पुरस्कार मानकरी धनंजय सोनकुळे, पत्रकार प्रफुल्ल शेवाळे, ओंकार गणपती मित्र मंडळ चे अध्यक्ष सुधीर भास्कर, मनीष दळवी यांचे विशेष सहकार्य लाभले.




**सुवर्ण अलंकारांनी सजलेले देवतांचे विलोभनीय रूप भाविकांचे ठरतेय आकर्षण**

# श्री गौरी विसर्जन व राधाष्टमी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी, महालक्ष्मी व राधिका मातेस पारंपरिक सुवर्ण अलंकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री गौरी विसर्जन निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल, रुक्मिणी माता व महालक्ष्मी मातेस तसेच राधाष्टमी निमित्त राधिका मातेस आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. सुवर्ण अलंकारांनी सजलेले देवतांचे मनोहारी, तेजस्वी व भक्तिमय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.



श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या, हिऱ्याचे कंगन, बालाजी नाम शिरपेच, मोत्याचा तुरा, मोत्याच्या कंठ्या, मोहनमाळ, तुळशीची माळ, नवरत्नांचा हार, पानाड्याचा हार तसेच सोन्याचे व हिऱ्यांचे पैंजण आदी पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या-तोडे, ताणवड, चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची व पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी अलंकारांनी सजविण्यात आले आहे.

महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, एकपदरी मोत्याची कंठी, नेकलेस, शिरपेच, अष्टपैलू मण्यांची कंठी व लक्ष्मी लॉकेट आदी अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

तसेच राधाष्टमी निमित्त राधिका मातेस नक्षी टोप, मोत्याचा कंठा, मोत्याचे मंगळ-सूत्र, हिरवी चिंचपेटी, ठुशी व पुतळ्यांची माळ आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

या पारंपरिक सुवर्ण अलंकारांमुळे श्री विठ्ठल, रुक्मिणी माता, महालक्ष्मी माता व राधिका मातेचे रूप अधिकच मनोहारी, तेजस्वी आणि भक्तिमय दिसत असून, हे विलोभनीय रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. भाविक भक्तिभावाने देवतांचे दर्शन घेत असल्याचे माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे खामसवाडी प्रतिनिधी - कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जगदंबा माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहण व अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. सकाळी ठीक ८ वाजता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाला मानवंदना देत झेंडावंदन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत म्हटले. शाळेच्या प्रांगणात देशभक्तीपर गीतांनी परिसर भारावून गेला होता.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि ग्राम स्थांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापकांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास सांगितला. ते म्हणाले, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला तरी मराठवाडा अजूनही निजामाच्या जुलमी राजवटीत होता. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पोलीस क्शनमुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या तावडीतून मुक्त झाला. या स्वातंत्र्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ यांच्यासह असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी आणि सामान्य जनतेने आपल्या प्राणांची आहुती दिली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामावर आधारित भाषणे, पोवाडे आणि देशभक्तीपर गीते सादर केली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना या ऐतिहासिक लढ्याची जाणीव ठेवून स्वातंत्र्य, समता आणि लोकशाहीची मूल्ये जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षकांनी केले तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षकांनी केले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून करण्यात आली.

# स्वेरीच्या डॉ.बी.पी. रोंगे सरांना पुणे विभागात सर्वत्र प्रतिसाद

## डॉ. रोंगे सरांना होणार सुक्ष्म अभ्यासाचा फायदा; पाचही जिल्ह्यात वैयक्तिक भेटीगाठीवर विशेष भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कुर्डुवाडी- राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया सध्या जोर धरत असल्याचे चित्र दिसत असून यामध्ये पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रणधुमाळी सुरू आहे. यामध्ये शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरच्या दृष्टीने झपाट्याने गती आणणारे गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करत असल्याचे पाहायला मिळत आहे. डॉ.रोंगे सर यांनी गेल्या वर्षापासून पुणे विभागातील शाळा महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देण्यावर भर दिला असून ग्राउंड पातळीवर डॉ. रोंगे सरांना प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.



या अनुषंगाने प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली आहे. डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे स्वेरीला अफाट यश मिळाले असून स्वेरी बरोबरच कासेगाव (ता. पंढरपूर) मधील स्वाईप तथा श्री.विठ्ठल इन्स्टिटयूट ऑफ प्रोगेसिव्ह एज्युकेशन व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीला देखील अफाट यश मिळत आहे. यामुळे राज्याचे लक्ष या तीन शैक्षणिक संकुलाकडे लागलेले असून ग्रामीण भागात असलेल्या या तीन शाळा- महाविद्यालयांनी अल्पावधीत गरुडझेप घेतली. या तिहेरी कारणामुळे डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा प्रतिसाद मिळत आहे. मागील साधारण वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांनी पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु आहेत. विशेष म्हणजे त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्था चालकांना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना डॉ. रोंगे सर भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चेला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी सरांना पाठिंबा दर्शविला आहे तसेच दौऱ्यात डॉ. रोंगे सरांच्या सोबत ते फिरताना दिसत आहेत. या भेटीमध्ये सर्व शाळांमध्ये प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक वर्ग शिक्षकेतर कर्मचारी कमालीचे स्वागत करत आहेत. मागील उमेदवारांनी काहीही केले नसल्याची भूमिका घेत आता रोंगे सरांमुळे उत्साह वाढल्याचे दिसत आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरीतील अफाट यशामुळे सर्व शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. ज्याप्रमाणे डॉ.रोंगे सर हे विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल करत आहेत त्याचप्रमाणे त्यांनी शिक्षकांचेही भविष्य उज्वल करावे, अशी अपेक्षा या निमित्ताने जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्याच आठवड्यात त्यांनी माढा तालुक्यातील शाळांना भेटी देऊन आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी कै. गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला माढा, महात्मा फुले विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, टेंभुर्णी, तुकाराम घाडगे विद्यालय वरवडे, विनायक विद्यालय वरवडे, न्यू इंग्लिश स्कूल उंदरगाव, माध्यमिक आश्रम शाळा केवड यांसह इतर शाळांना भेटी देऊन समस्या जाणून घेतल्या. आमदार होण्यापूर्वीच डॉ. रोंगे सरांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळांमधील एकूण २७ मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या पदोन्नतीनंतर तब्बल आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेला पदमान्यता व वेतनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. त्याचबरोबर सोलापूर जिल्हा सेवा अभियानांतर्गत प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिले होते. त्या अनुषंगाने त्यांचे विशेष कार्यकारी अधिकारी संतोष साखरे यांच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदोन्नती, नियुक्ती व सेवा विषयक एकूण ३७ प्रकरणे सोडवली गेली आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आहे. या प्रकरणांच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने कार्यवाही करत एकाच दिवसात ३७ प्रकरणांची सोडवणूक करून न्याय दिला आहे. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या कारणामुळे डॉ. रोंगे सरांच्या भेटींचे सर्वत्र स्वागत होत आहे. या भेटी दरम्यान बोलताना डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी, समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते. परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून असे प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र डॉ. रोंगे सरांना प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. यावेळी प्राचार्य, मुख्याध्यापक, सहशिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आमदार होण्यापूर्वीच त्यांनी कांही प्रश्न सोडविले आहेत त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# आढाळा शाळेत १०७ विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेसचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि सुधाकर रणदिवे, गणेशोत्सव म्हणजे केवळ उत्सव आणि आनंद नव्हे, तर आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उत्सवही आहे. याच उदात्त भावनेतून कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथे प्रसिद्ध शिवव्याख्याते, स्वप्नपूर्ती कन्स्ट्रक्शनचे संचालक, स्वप्नपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे सचिव तथा उपक्रमशील शिक्षक श्री. महादेव हरिकिशन खराटे यांनी शाळेतील तब्बल १०७ विद्यार्थ्यांना सुमारे ३० हजार रुपये किमतीचे स्पोर्ट ड्रेस स्वखर्चाने उपलब्ध करून दिले.

या स्पोर्ट ड्रेसचे वाटप कळंब पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष व अभ्यासू व्यक्तिमत्त्व विस्तार अधिकारी श्री. हनुमंत झांबरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ग्रामविकास अधिकारी नवनाथ खाडे, शिक्षणप्रेमी नागरिक जयचंद वायसे, भगवानराव मिंड यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

**गणेशोत्सवाच्या निमित्ताने महादेव खराटे यांचा सामाजिक दातृत्वाचा प्रेरणादायी उपक्रम**

याप्रसंगी बोलताना श्री. हनुमंत झांबरे यांनी महादेव खराटे यांच्या दातृत्वाचे कौतुक करत समाजातील दानशूर व्यक्तींनी शिक्षण प्रक्रियेला आर्थिक व सामाजिक सहकार्य देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य अधिक बळकट होते. देशहितासाठी अशा सामाजिक दातृत्वाची गरज आहे, असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि नव्या स्पोर्ट ड्रेसमुळे निर्माण झालेला आत्मविश्वास हेच या उपक्रमाचे खरे समाधान असल्याची भावना महादेव खराटे यांनी व्यक्त केली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या प्रेरणादायी सामाजिक दातृत्वाच्या उपक्रमाचे आढाळा परिसरातून कौतुक होत असून, समाजासाठी काहीतरी देण्याची भावना इतरांमध्येही निर्माण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महादेव खराटे यांनी केले. सूत्रसंचालन तुकाराम कराळे यांनी तर आभार प्रदर्शन शिवानंद स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक बलभीम राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बोरगाव (बु) येथे विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे : खाम सवाडी दि.१९(प्रतिनिधी) गणेशोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत विघ्नहर्ता गणेश मंडळ, बोरगाव (बु) यांच्या वतीने आणि लातूर ब्लड बँक सेंटर अँड कंपोनंट, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान हेच श्रेष्ठ दान या पवित्र संदेशाने प्रेरित होऊन आयोजित केलेल्या या शिबिरास बोरगाव बुद्रुक व परिसरातील नागरिक, युवक वर्ग आणि गणेशभक्तांनी मोठा प्रतिसाद दिला.

सकाळपासूनच रक्तदान करण्यासाठी युवकांमध्ये उत्साह दिसून येत होता. या शिबिरात एकूण ४० रक्तदात्यांनी स्वेच्छेने

**शिबिरात ४० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

रक्तदान करून सामाजिक कार्यात आपला हातभार लावला. रक्ताच्या कमतरतेमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचे प्राण जाऊ नयेत आणि वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने अनेकांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

या रक्तदान शिबिराचे संपूर्ण नियोजन मंडळाचे पदाधिकारी श्री. मंगेश बलभीम लोणकर आणि श्री. व्यंकट पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. मंडळाच्या स्वयंसेवकांनी रक्तदात्यांची नोंदणी करणे, त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे आणि शिबिर सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. लातूर ब्लड बँकेच्या वैद्यकीय पथकाने रक्त संकलनाचे काम अत्यंत कुशलतेने केले.



शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी आणि उपस्थित मान्यवरांनी विघ्नहर्ता गणेश मंडळाचे मनापासून कौतुक केले असून मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

शेवटी मंडळाच्या वतीने सर्व रक्तदात्यांचे, लातूर ब्लड बँक सेंटरचे आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले.



# माजी आमदार बबनदादा शिंदे यांची नागेश फाटे यांनी घेतली सदिच्छा भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अमेरिकेत उपचार घेऊन मायभूमीत परतलेले माजी आमदार बबनदादा शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी काँग्रेस कमिटी सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष श्री. हनुमंतराव मोरे उपस्थित होते. या भेटीत नागेश फाटे यांनी बबनदादा शिंदे यांच्याशी संवाद साधून त्यांची आस्थेने विचारपूस केली.

याप्रसंगी नागेश फाटे यांच्या हस्ते माजी आमदार बबनदादा शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फाटे यांनी बबनदादा शिंदे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बबनदादा शिंदे यांच्याशी झालेली ही सदिच्छा भेट आत्मीय संवादाची ठरली. पांडुरंगचरणी प्रार्थना करून त्यांना सुख, समाधान व दीर्घायुष्य लाभावे, अशी भावना नागेश फाटे यांनी व्यक्त केली.

# उरुळी कांचन पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले सहाय्यक फौंजदार गणेश दाभाडे यांचा अपघाती मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/ डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर :: पुणे सोलापूर हायवे मार्गावर उरुळी कांचन येथे भरधावं गाडीच्या धडकेने कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याचाच बळी घेतला असून, ससून रुग्णालयातील मयताचा बंदोबस्त करून पूर्ण पणे उरुळी कांचनला परतल्यानंतर जेवणासाठी रस्ता ओलांडणाऱ्या उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणेश रतन दाभाडे वय ४९ मूळ राहणार मेथी तालुका सिंदखेडा जिल्हा धुळे सध्या राहणार सासवड यांचा भरदार अज्ञात वाहनाच्या धडकेमध्ये दुर्दैवी असा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी दिनांक १८ मध्यरात्रीच्या सुमारामध्ये उरुळी कांचन हद्दीतील श्रीकृष्ण मंगल कार्यालयासमोर महामार्गावर हा अपघात झाला असून, याबाबत पोलीस शिपाई आशिष संजय उल्हाळकर यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार उरुळी कांचन येथील पांढरस्थळ परिसरात शुक्रवारी सकाळी पाण्यात वाहत आलेले अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आला होता या मृतदेहाचे ससून रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पोलीस शिपाई आशिष उल्हाळकर बरोबर पुण्यातील ससून रुग्णालयात गेले होते, मृतदेहाची ओळख पटली नसल्याने, रुग्णालयाच्या सेवागृहात ठेवण्यात आला. रात्री उशिरा पुण्यावरून उरुळी कांचन येथे आल्यावर जेवणासाठी जाताना रस्ता ओलांडताना अज्ञात वाहणाच्या जोरदार धडकेने त्यांचा मृत्यू झाला. अंत्यविधी साठी मृतदेह त्यांच्या मूळ गावी नेण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, व दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या अपघाती मृत्यूमुळे पुणे ग्रामीण पोलीस दलामध्ये शोककळा पसरली आहे.

**अच्छे दिन'पासून '१५ लाखां'पर्यंत रिपब्लिकन सेनेचे 'मोदी चॉकलेट' आंदोलन**

# मोदी' चॉकलेट वाटून पंतप्रधानांचा वाढदिवस; 'मेलोडी'ला नागरिकांची पसंती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे संभाजीनगर : अच्छे दिन, १५ लाख, रोजगार, स्वस्त इंधन आणि शेतमालाच्या हमीभावाच्या मुद्द्यांवर रिपब्लिकन सेनेचा उपरोधिक निषेध

छत्रपती संभाजीनगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रिपब्लिकन सेनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर शहरातील पैठण गेट येथे गुरुवारी सायंकाळी ६ वाजता अनोख्या आणि उपरोधिक पद्धतीने निषेध आंदोलन करण्यात आले. 'मोदी चॉकलेट' आणि 'मेलोडी चॉकलेट'चे वाटप करत मोदी सरकारच्या आश्वासनांची आठवण करून देण्यात आली.

आंदोलनादरम्यान 'मोदी चॉकलेट'च्या माध्यमातून 'अच्छे दिन', १५ लाख रुपये, प्रतिवर्षी २ कोटी रोजगार, स्वस्त इंधन, प्रत्येकाला स्वस्त गॅस, शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी आदी मुद्द्यांचा उल्लेख करण्यात




आला.

या आश्वासनांबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या अपेक्षा आणि त्यानंतरच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी चॉकलेट वाटपाचे उपरोधिक वाटप करण्यात आले.

विशेष बाब म्हणून 'आत्मनिर्भर भारत' या नावाने 'मेलोडी' चॉकलेटचेही वाटप करण्यात आले. 'मोदी' आणि 'मेलोडी' या शब्दांतील साम्याचा आधार घेत आंदोलनकर्त्यांनी सरकारच्या घोषणांवर आणि आश्वासनांवर उपरोधिक भाष्य केले.

रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी नागरिकांशी संवाद साधत केंद्र सरकारच्या विविध घोषणा, आश्वासने आणि त्यांची अंमलबजावणी याबाबत प्रश्न उपस्थित केले. वाढती महागाई, रोजगाराच्या संधी, इंधनाचे दर, घरगुती गॅस, शेतमालाचे भाव

**"आत्मनिर्भर भारत'च्या नावाने 'मेलोडी' चॉकलेट; रिपब्लिकन सेनेचा मोदींच्या वाढदिवशी उपरोधिक निषेध**

आणि शेतकरी प्रश्न याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

'मोदी चॉकलेट'पेक्षा नागरिकांनी 'मेलोडी' चॉकलेटला अधिक पसंती दिली. चॉकलेट वाटपादरम्यान नागरिकांनी विविध प्रतिक्रिया व्यक्त करत सरकारकडून करण्यात आलेल्या घोषणांबाबत अपेक्षा पूर्ण झाल्या नसल्याची नाराजी व्यक्त केली व पुन्हा मोदी नको अश्या प्रतिक्रिया दिल्या ईव्हीएम च्या जीवावर मोदी निवडून येतात असा टोलाही नागरिकांनी लगावला.

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी हे चॉकलेट वाटप असून, जनतेला केवळ घोषणा नकोत तर प्रत्यक्ष परिणाम हवेत, अशी भूमिका रिपब्लिकन सेनेच्या वतीने मांडण्यात आली.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७६वा वाढदिवस १७ सप्टेंबर रोजी देशभर विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. रिपब्लिकन सेनेने मात्र याच दिवशी उपरोधिक चॉकलेट वाटपाच्या माध्यमातून सरकारच्या धोरणांवर आणि आश्वासनांवर प्रश्न उपस्थित करत आपला निषेध नोंदविला.

यावेळी के व्ही मोरे, सचिन निकम, मिलिंद मोकळे, सुनील पांडे, अजय बनसोडे, राहुल गवळी, राष्ट्रपाल गवई, बाळू गायकवाड,अतुल चव्हाण, सचिन शिंगाडे, राजू मगरे, अनिल खरात, आकाश पंडित, अमोल तुपे आदींनी आंदोलनात सहभाग घेतला.